RNI No. MAHBIL /2009/37831

सत्यमेव जयते

# महाराष्ट्र शासन राजपत्र

## असाधारण भाग चार—ब

वर्ष ७, अंक ६९(३)] मंगळवार, जून ८, २०२१/ज्येष्ठ १८, शके १९४३ [पृष्ठ ७, किंमत : रुपये ९.००

असाधारण क्रमांक १५०

### प्राधिकृत प्रकाशन

**महाराष्ट्र शासनाने महाराष्ट्र अधिनियमांन्वये तयार केलेले**
**(भाग एक, एक-अ आणि एक-ल यांमध्ये प्रसिद्ध केलेले नियम व आदेश यांव्यतिरिक्त) नियम व आदेश.**

### गृह विभाग

मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक, मंत्रालय,
मुंबई ४०० ०३२, दिनांक ७ जून २०२१.

### अधिसूचना

**महाराष्ट्र दारुबंदी अधिनियम.**

क्रमांक बीपीए. ०८१९/प्र.क्र. १४६/राउशु-२.— ज्याअर्थी, महाराष्ट्र शासनास असे वाटते की, महाराष्ट्र देशी दारु नियम, १९७३, मध्ये आणखी सुधारणा करून खालील नियम तात्काळ अंमलात आणले जावेत आणि म्हणून, हे नियम, महाराष्ट्र दारुबंदी अधिनियम (१९४९ चा २५ वा) चे कलम १४३ चे पोट–कलम (३) मधील परंतुकानुसार तरतूद केल्याप्रमाणे पूर्वप्रसिद्धीशिवाय तयार करण्यात यावेत, असे महाराष्ट्र शासनास वाटते.

त्याअर्थी, आता महाराष्ट्र दारुबंदी अधिनियम, १९४९ चे कलम १४३ चे पोट-कलम (२) च्या खंड (एच-१) द्वारे प्रदान करण्यात आलेल्या अधिकारांचा आणि याबाबत महाराष्ट्र शासनास समर्थ करणाऱ्या इतर सर्व अधिकारांचा वापर करून, याद्वारे, महाराष्ट्र शासन, महाराष्ट्र देशी दारु नियम, १९७३, मध्ये आणखी सुधारणा करण्यासाठी खालीलप्रमाणे नियम करीत आहे, ते असे :-

१. या नियमांना, महाराष्ट्र देशी दारु (दुसरी सुधारणा) नियम, २०२१ असे संबोधण्यात यावे.

२. महाराष्ट्र देशी दारु नियम, १९७३ (यात यापुढे ज्याचा “ प्रधान नियम ” असा निर्देश करण्यात आला आहे) मधील नियम १९ मधील “ आयुक्तांद्वारे ” हे शब्द वगळण्यात येत आहेत.

३. प्रधान नियमातील नियम २१ मधील " सायंकाळी ५-०० " या अंक व अक्षरांऐवजी " सायंकाळी ८-०० " असे वाचावे.

४. प्रधान नियमातील नियम २६ मधील उप नियम (१) मध्ये खंड (बी) मधील उप खंड (vii) ऐवजी खालील उप खंड समाविष्ठ करण्यात येत आहे.

" (vii) दारुबंदी सप्ताहातील पहिला दिवस म्हणजेच २ ऑक्टोबर, "

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

**युवराज ब. अजेटराव,**
शासनाचे उप सचिव.

## HOME DEPARTMENT

Madam Cama Marg, Hutatma Rajguru Chowk, Mantralaya,
Mumbai 400 032, dated 7th June 2021.

*NOTIFICATION*

MAHARASHTRA PROHIBITION ACT.

No. BPA. 0819/C.R. 146/EXC-2.— Whereas, the Government of Maharashtra considers that the following rules further to amend the Maharashtra Country Liquor Rules, 1973, should be brought into force at once, and therefore, the rules should be made without previous publication as provided by the proviso to sub-section (*3*) of section 143 of the Maharashtra Prohibition Act (XXV of 1949).

Now, therefore, in exercise of the powers conferred by clause *(h1)* of sub-section (*2*) of section 143 of the Maharashtra Prohibition Act, 1949 and of all other powers enabling it in that behalf, the Government of Maharashtra hereby makes the following rules further to amend the Maharashtra Country Liquor Rules, 1973, as follows, namely :—

1. These rules may be called the Maharashtra Country Liquor (Second Amendment) Rules, 2021.

2. In rule 19 of the Maharashtra Country Liquor Rules, 1973, (hereinafter referred to as " the Principal Rules ") the words " the Commissioner through " shall be deleted.

3. In rule 21 of the Principal Rules, for the figures and letters " 5-00 p.m. " the figures and letters " 8-00 p.m. " shall be substituted.

4. In rule 26 of the Principal Rules, in clause *(b) of* sub-rule (1), for sub-clause (*vii*), the following sub-clause shall be substituted namely :—

" (*vii*) First day of Prohibition Week that is 2nd October, "

By order and in the name of the Governor of Maharashtra,

YUVRAJ B. AJETRAO,
Deputy Secretary to Government.